दै. सकाळ दि. 08/12/2022

दै. सकाळ दि. 08/12/2022

# महाराष्ट्र पोलिस नेमबाजी स्पर्धेत नांदेड पोलिसांची कामगिरी

## तामिळनाडू येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी शंकर भारती यांची निवड

सकाळ वृत्तसेवा

नांदेड, ता. ७ : पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र पोलिस नेमबाजी स्पर्धेत नांदेड पोलिस दलातील क्युआरटी पथकातील पोलिस अधिकारी विठ्ठल घोगरे, शंकर भारती, ज्ञानोबा चौंडे, केशव अवचार, हनमंत पाखलवार सहभागी झाले होते. शंकर भारती यांनी १५ मीटर पिस्टल कॉर्टींग पोजिशन या प्रकारात सुवर्णपदक, तर ज्ञानोबा चौंडे यांनी पिस्टर स्नॅप फायर प्रकारात कांस्य पदक पटकावले आहे.



नांदेड : पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र पोलिस नेमबाजी स्पर्धेमध्ये सुवर्ण आणि कांस्य पदक पटकाविणाऱ्या नांदेड पोलिस दलातील शंकर भारती आणि ज्ञानोबा चौंडे यांचा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सत्कार केला.

महाराष्ट्र पोलिस क्रिडा स्पर्धा २९ नोव्हेंबर ते दोन डिसेंबर दरम्यान पुणे झाल्या आहेत. विजेत्यांना राज्य राखीव पोलिस बल गट क्रमांक एकचे समादेशक प्रवीण कुमार पाटील, नानविज पोलिस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य रामचंद्र केंडे यांच्या उपस्थितीत पदकांचे वितरण करण्यात आले. तामिळनाडू येथे होणाऱ्या अखिल भारतीय पोलिस नेमबाजी स्पर्धेसाठी शंकर भारती यांची निवड झाली आहे.

विजेत्यांचे नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक निसार तांबेळी, जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलिस अधीक्षक अबिनेश कुमार, भोकरचे अपर पोलिस अधीक्षक डॉ. खंडेराव धरणे, पोलिस उपअधिक्षक डॉ. अश्विनी जगताप यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.